सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०२/२०१२-१३

महापालिका सभा दिनांक १९/०५/२०१२ करीता.

शनिवार दि.१९/०५/२०१२ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.सौ.सुनिता शिवदास पाटील, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रात वॉर्ड क्र.२९ मधील जवाहर हौसिंग सोसा.च्या उत्तर बाजूचा पु+प १०० फुटी जुना कुपवाड रस्त्यावरील कै.भालेंद्र दडगे मार्गापासून जवाहर हौसिंग सोसा. पर्यंतच्या रस्त्यावर असणारे अतिक्रमण हटविणेसाठी श्री.ऐनापूरे, श्री.बर्वे व श्री.हेर्लेकर या जाग्रुक व सामाजिक बांधिलकीचे भान असणाऱ्या नागरिकांनी गेली ३८ वर्षे प्रदीर्घ न्यायालयीन लढा देऊन सदर रस्त्याची जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्यास भाग पाडले आहे. त्यांची ही कृती नागरिकांच्या व महापालिकेच्या हिताची आहे. म्हणूनच स्थानिक सहिवाशी नागरिकांची वर नमूद रस्त्यास श्री. ऐनापुरे-बर्वे-हेर्लेकर असे नामकरण करणेची मागणी होत आहे. नमूद वस्तूस्थिती लक्षात घेऊन वार्ड क्र.२९ मधील जवाहर हौसिंग सोसा.च्या उत्तर बाजूचा पु+प १०० फुटी जुना कुपवाड रस्त्यातील कै.भालेंद्र दडगे मार्गापासून जवाहर हौसिंग सोसा. पर्यंतच्या रस्त्याचे ऐनापुरे-बर्वे-हेर्लेकर असे नामकरण करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.श्री.युवराज सतिश बावडेकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली मधील मारुती चौकातील मारुती मंदिर समोर डिजीटल बोर्ड व हातगाडे लावले जातात. मारुती चौकामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय, व्यवसायीक उद्योजकांचे डिजीटल बोर्ड लावले जातात. तसेच या परिसरात हातगाड्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असतो. शहरातील प्रमुख रस्ता असल्याने नागरिकांची व छोट्या मोठ्या वाहनधारकांची ये-जा सुरु असते. त्या ठिकाणी डिजीटल बोर्ड व हातगाडे लावणे गैरसोयीचे ठरत आहे. नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. तसेच, या रस्त्यावर वरदळ फार असते त्यामुळे डिजीटल बोर्ड व हातगाडे अडथळ्याचा विषय ठरत आहे. तरी मारुती चौकातील मारुती मंदिर समोर डिजीटल बोर्ड लावणे व हातगाडे लावणेस मनाई करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.श्री.युवराज सतिश बावडेकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सांगली येथील गांवभाग मनपा शाळा नं.२ च्या शेजारी असलेली मुतारी पाडणे आवश्यक आहे. शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना मुतारीचा त्रास होत आहे. आसपास सर्व बाजूला मोठमोठे अपार्टमेंटस् झालेले असून, सदरची मुतारी पाडणेबाबत नागरिकांची मागणी होत आहे. त्याचप्रमाणे त्या मुतारीच्या जवळ अमरधाम स्मशानभूमी येथे दुसरी मुतारी झालेने त्या ठिकाणचे नागरिकांची गैरसोय होणार नाही. तरी, गांवभाग, मनपा शाळा नं.२ शेजारील मुतारी पाडणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.सौ. आशा नितीन शिंदे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा विभागाकडील पाणी बिलाचे सवलतीसाठी महापौर योजना सुरु होती. सध्या ती बंद आहे त्यामुळे भागातील अद्यापी बरेच नागरीक पाणी बिल भरणेची राहीलेली आहेत. त्यामुळे नागरिकांचे सवलतीसाठी पाणी बिलाबाबतची महापौर योजना दोन महिने वाढवुन मिळणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.श्री.सुभाष (दादा) दरीबा गोयकर, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील शाळा नं.४२ संजयनगर सांगली या शाळेच्या चार खोल्या निकृष्ठ दर्जाचे व धोकादायक बनलेले आहेत. त्यामुळे निकृष्ठ दर्जाच्या खोल्यामुळे मुलांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे, या शाळेतील चार खोल्या पाडणेसाठी मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

६. मा.श्री.विजयकुमार धनपाल हाबळे, यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांनी गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपलेली आहे. परंतू अद्यापही बऱ्याच नागरिकांनी गुंठेवारी प्रस्ताव दाखल केलेले नाहीत अशा नागरिकांकडून मुदतवाढ देणे बाबत वारंवार विचारणा होत आहे. तसेच सन्मा.सदस्यांकडूनही मुदतवाढ देणे बाबत मागणी होत आहे. तरी, नव्याने गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेस मुदतवाढ मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १६/०५/२०१२.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- २९

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.सुनिता शिवदास पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात वॉर्ड क्र.२९ मधील जवाहर हौसिंग सोसा.च्या उत्तर बाजूचा पु+प १०० फुटी जुना कुपवाड रस्त्यावरील कै.भालेंद्र दडगे मार्गापासून जवाहर हौसिंग सोसा. पर्यंतच्या रस्त्यावर असणारे अतिक्रमण हटविणेसाठी श्री.ऐनापूरे, श्री.बर्वे व श्री.हेर्लेकर या जाग्रुक व सामाजिक बांधिलकीचे भान असणाऱ्या नागरिकांनी गेली ३८ वर्षे प्रदीर्घ न्यायालयीन लढा देऊन सदर रस्त्याची जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्यास भाग पाडले आहे. त्यांची ही कृती नागरिकांच्या व महापालिकेच्या हिताची आहे. म्हणूनच स्थानिक रहिवाशी नागरिकांकडून वर नमुद रस्त्यास श्री. ऐनापुरे-बर्वे-हेर्लेकर असे नामकरण करणेची मागणी होत आहे. नमुद वस्तूस्थिती लक्षात घेऊन वार्ड क्र.२९ मधील जवाहर हौसिंग सोसा.च्या उत्तर बाजूचा पू+प १०० फुटी जुना कुपवाड रस्त्यातील कै.भालेंद्र दडगे मार्गापासून जवाहर हौसिंग सोसा. पर्यंतच्या रस्त्याचे ऐनापुरे-बर्वे-हेर्लेकर असे नामकरण करणेस महानगरपालिकेने निश्चित केले धोरणानुसार कार्यवाही ठेवणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक [signature] महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक
सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवावी.

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 30

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली येथील मारुती चौकातील मारुती मंदिर समोर डिजीटल बोर्ड व हातगाडे लावले जातात. मारुती चौकामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय, व्यवसायीक उद्योजकांचे डिजीटल बोर्ड लावले जातात. तसेच या परिसरात हातगाड्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असतो. शहरातील प्रमुख रस्ता असल्याने नागरिकांची व छोट्या मोठ्या वाहनधारकांची ये-जा सुरु असते. त्या ठिकाणी डिजीटल बोर्ड व हातगाडे लावणे गैरसोयीचे ठरत आहे. नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. तसेच, या रस्त्यावर वरदळ फार असते त्यामुळे डिजीटल बोर्ड व हातगाडे अडथळ्याचा विषय ठरत आहे. त्यामुळे मारुती चौकातील मारुती मंदिर समोर डिजीटल बोर्ड लावणे व हातगाडे लावणेस मनाई करणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने याबाबतची यथोचित कारवाई तात्काळ सुरु करावी असे ही सभा आदेशीत करीत आहे.

उक्त विषयास अनुसरुन मा.श्री.विजयकुमार धनपाल हाबळे यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली शहरातील विश्रामबाग येथील गणपती मंदिर समोर मोठ्या प्रमाणात राजकीय व व्यावसायिक डिजीटल बोर्ड लावले जातात. त्यांचा बंदोबस्त करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच हातगाड्यांचा सुद्धा या चौकात जास्त प्रमाणात वावर सुरु झाला आहे. सदरचा रस्ता प्रमुख रस्ता असलेने नागरिक व छोट्या मोठ्या वाहन धारकांची ये-जा करीत असताना फार गैरसोयीचे ठरत आहे व नागरीकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच, रस्त्यावर वर्दळीचे मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यातच डिजीटल बोर्ड व हातगाडी लावले असलेने नागरिकांस व वाहतुकीस अडथळा ठरत आहे. यासर्व बाबींचा विचार करुन ही सभा विश्रामबाग गणपती मंदिर समोर व परिसरामध्ये हातगाडे व चौकामध्ये डिजीटल बोर्ड लावणेस मनाई करणेस ही मान्यता देत असून, प्रशासनाने याबाबतची यथोचित कार्यवाही तात्काळ सुरु करावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक उपसूचनेप्रमाणे ठराव सर्वानुमते मंजुर

मा.महासभा अध्यक्षांच्या मान्यतेस अधिन राहून अंमलबजावणी करणेत यावी.

अनुमोदक :-

महापौर.

महापालिकेचे सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 39

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.युवराज सतिश बावडेकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सांगली येथील गांवभाग मनपा शाळा नं.२ च्या शेजारी असलेली मुतारी पाडणे आवश्यक आहे. शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थीनींना मुतारीचा त्रास होत आहे. आसपास सर्व बाजूला मोठमोठे अपार्टमेंटस् झालेले असून, सदरची मुतारी पाडणेबाबत नागरिकांची मागणी होत आहे. त्याचप्रमाणे त्या मुतारीच्या जवळ अमरधाम स्मशानभूमी येथे दुसरी मुतारी झालेने त्या ठिकाणचे नागरिकांची गैरसोय होणार नाही. असे या सभेचे मत असून, गांवभाग, मनपा शाळा नं.२ शेजारील मुतारी पाडणेस ही सभा मान्यता देत असून, प्रशासनाने तात्काळ कार्यवाही ठेवावी असे आदेशित करीत आहे.

उक्त विषयास अनुसरुन मा.सौ.सूमन आकाराम कदम यांनी दिलेली उपसूचना दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील सांगलीवाडी येथील वॉर्ड क्र.१६ मधील राममंदिर जवळील पाणपोई काढून टाकणे आवश्यक आहे. सदर पाणपोईमुळे येथे येणाऱ्या भाविकांना अडथळानिर्माण होत असून, सद्या येथील सार्वजनिक पाणी पुरवठा बंद असलेने सदर पाणपोई निरुपयोगी ठरत आहे. यासर्व बाबींचा विचार करुन व पाणपोई काढणेसाठी येथील नागरीक मागणी करीत असलेने, सदर पाणपोई काढणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- [signature] ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक [signature] महापौर,

[illegible]

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 32

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्या सौ.आशा नितिन शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा विभागाकडील पाणी बिलाचे सवलतीसाठी महापौर योजना सुरु होती. सध्या ती बंद आहे त्यामुळे भागातील अद्यापी बरेच नागरीक पाणी बिल भरणेची राहीलेली आहेत. त्यामुळे नागरिकांचे सवलतीसाठी पाणी बिलाबाबतची महापौर योजना दोन महिने वाढवून मिळणेबाबतच्या प्रस्तावावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे. पाणी बिलाचे सवलतीसाठीची महापौर उपभोक्त योजना वारंवार दिर्घ कालावधीसाठी चालू ठेवणे योग्य होणार नाही असे या सभेचे मत असून, पाणी बील थकबाकी वसुलीसाठीच्या या योजनेस आणखी एक अंतिम व शेवटची संधी नागरीकांना दयावी व त्यांनतर ही योजना कायमस्वरुपी बंद करावी असे या सभेचे मत आहे. त्यासाठी दि.३०/०६/२०१२ अखेर या योजनेची मुदत अंतिमरित्या वाढविण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच प्रशासनाने या मुदत काळात पाणी पट्टीची थकबाकी वसुलीसाठी जोरदार प्रयत्न करावेत व या अंतिम सवलतीची माहिती नागरीकांना देण्यासाठी वृत्तपत्रात जाहिर निवेदन प्रसिद्ध करावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक आशा पदीन घाबाणी

अनुमोदक :- Salim A. [illegible]

ठराव बहुमताने मंजुर

महापौर,

कार्य. अभियंता (पा.पु.)
सदस्या ठराव मा. आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही ठेवावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 33

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.सुभाष दरिबा गोयकर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील शाळा नं.४२ संजयनगर सांगली या शाळेच्या चार खोल्या धोकादायक बनलेल्या आहेत. या खोल्यामुळे मुलांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे, या शाळेतील चार खोल्या पाडणेसाठीच्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील शाळा नं.४२ संजयनगर सांगली मधील धोकादायक बनलेल्या शाळेच्या चार खोल्यांचा प्रशासनाने तात्काळ सर्व्हे करावा व सदरच्या खोल्या धोकादायक असल्यास त्या पाडणेस प्रस्तावानुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त प्रस्तावास अनुसरुन सन्मा.सदस्य श्री.सुरेश देवाप्पा आवटी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची संख्या कमी असल्याने तसेच, नविन शिक्षक भरतीस शासनाचे निर्बंध असल्याने, शिक्षण मंडळाची होणारी शैक्षणिक गैरसोय लक्षात घेवून शिक्षकांची पुरेशी संख्या होण्यासाठी शिक्षकांचे जिल्हा बदलीसाठीचे प्रस्ताव उपलब्ध असल्यास असे प्रस्ताव तातडीने प्राथमिक शिक्षण मंडळाने महासभेच्या मान्यतेस पाठवावेत असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- सुरेश आवटी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- सुरेश दुर्वे

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक
प्रशा.अधिकारी (प्रा.शि.मंडळ)
सदरचा ठराव मा.आयुक्तसो यांचे निर्देशनास आणून कार्यवाही करावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :-१९/०५/२०१२

ठराव क्रमांक :- 38

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.विजयकुमार धनपाल हाबळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांसाठीची गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेची मुदत दि.३०/११/२०११ रोजी संपलेली आहे. त्यामुळे गुंठेवारीचे प्रस्ताव दाखल करुन घेतले जात नाहीत. परंतू अद्यापही बऱ्याच नागरिकांनी गुंठेवारी प्रस्ताव दाखल केलेले नाहीत अशा नागरिकांकडून मुदतवाढ देणे बाबत वारंवार विचारणा होत आहे. या सर्व बाबींचा विचार करतो गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेस दि.३०/०९/२०१२ अखेर मुदतवाढ दयावी असे या सभेचे मत असून, त्यानुसार गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेस दि.३०/०९/२०१२ अखेर मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक उपमहापौर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

स.स.नं.र.

तरतुदीच्या मा.आयुक्तसो यांचे निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका